जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७४६ दिनांक - १५/१०/२०२३**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोक्का गुन्हयात तीन महिन्यापासुन फरारी असलेल्या आरोपीस केले शिताफीने जेरबंद

दि.२७/०६/२०२३ रोजी रात्रीचे वेळी स.नं.५४/२,अरणेश्वर आण्णा भाऊ साठे वसाहत, सहकारनगर पुणे येथे दोन गटात झालेल्या भांडणावरून सहकारनगर पोलीस स्टेशन येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामधील सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४४/२०२३ भा.द.वि.क. ३९५,३२३,४५२,१४३,१४४, १४७,१४८,१४९, ४२७,५०६(२),आर्म ॲक्ट कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३(२), ३(४) प्रमाणे दाखल गुन्हयातील काही आरोपी मिळून येत नव्हते.

दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचा मा.सहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग पुणे,श्री.संजय सुर्वे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे श्री.सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे राहुल खंडाळे व तपास पथकाचा स्टाफ तपास करीत असताना पोलीस उप-निरीक्षक राहुल खंडाळे, पोलीस अंमलदार सुशांत फरांदे व महेश मंडलीक यांना बातमी मिळाली की, दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे **अमर आनंत काथवटे वय २५ वर्षे रा.आण्णा भाऊ साठे वसाहत, अरणेश्वर पुणे** हा त्याचे मैत्रिणीस भेटण्यासाठी नवनाथ चौक, फॉरेस्टच्या भिंतीजवळ आंबेगाव पठार पुणे येथे येणार आहे. लागलीच सदर भागात सापळा लावुन त्यास ताब्यात घेवुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री. नारायण शिरगावकर मा.सहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग पुणे श्री.संजय सुर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलीस स्टेशन श्री.सुरेंद्र माळाळे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक राहुल खंडाळे, पोलीस अंमलदार बापु खुटवड, भुजंग इंगळे, सुशांत फरांदे, बजरंग पवार, अमोल पवार, निलेश शिवतारे, महेश मंडलिक, नवनाथ शिंदे, सागर सुतकर, विशाल वाघ यांनी केली आहे.